# (अ) व्याकरण विभाग



व्याकरण हे प्रत्येक भाषेचा प्राण आहे. म्हणून व्याकरण समजून घेतल्याने भाषेमध्ये कसे परिवर्तन होत जाते किंवा भाषेचे तुलनात्मक अध्ययन करण्यास कशी मदत होते हे समजते.

कोणत्याही भाषेचे अध्ययन करण्यासाठी त्या व्यक्तीस कमीत कमी एका भाषेचे तर ज्ञान असणे आवश्यक असते.

प्राकृत भाषा ही संस्कृत भाषेप्रमाणे एक प्राचीन भारतीय भाषा आहे. म्हणजे या दोन्ही भाषा समकालीन भाषा होत. त्यामुळे या दोन्ही भाषांचा उपयोग नाट्य साहित्यात झालेला दिसून येतो. त्यातूनच या दोन्ही भाषांच्या तुलनात्मक अध्ययनास प्रारंभ होऊन प्राकृत व्याकरण ग्रंथाची निर्मिती झालेली दिसून येते. प्रारंभीचे जे प्राकृत भाषेच्या व्याकरणाचे ग्रंथ निर्माण झाले त्यामध्ये प्राकृत भाषेच्या विद्वानांपेक्षाही संस्कृत भाषेच्या विद्वानांचे मोठे योगदान असलेले दिसून येते. त्यामुळेच संस्कृत भाषेशी तुलना करत करत प्राकृत व्याकरण ग्रंथाची रचना झालेली दिसून येते. त्यामुळे प्राकृत भाषेचे व्याकरण समजून घेण्यासाठी संस्कृत भाषेची मदत होते.

व्याकरण समजल्याने त्या-त्या भाषेत वाक्यरचना करणे किंवा संभाषण करण्यास मदत होते. वाक्यरचना करण्यासाठी सर्वनामे, काळ, अर्थ, विभक्ती प्रत्यय, शब्दसंग्रह, प्रयोग इ. चे ज्ञान असणे आवश्यक आहे. तर संधी, समासाच्या ज्ञानाने मोठमोठ्या वाक्यांचे लहान-लहान वाक्यांत रूपांतर करता येते. त्यामुळे वाक्यरचना सुलभ होण्यास मदत होते. म्हणून व्याकरणाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने या पाठ्यपुस्तकात प्राकृतातील वर्णबदल कसे होतात ते दिलेले आहेत.

प्रारंभी प्राकृत भाषेतील वर्णांचा परिचय दिलेला आहे. त्यानंतर संस्कृत आणि मराठी भाषेतील वर्णाचा प्राकृतात कसा बदल होतो तेही स्पष्ट केलेले आहे. त्यानंतर वर्तमान, भूत, भविष्यकाळाचे प्रत्यय, अर्थ, विभक्ती, सर्वनामे इ. चे प्रत्यय दिलेले आहेत. त्यांचा परिचय करून विद्यार्थी वाक्यरचना तसेच निबंध लेखन, संभाषण करण्याचा प्रयत्न करतील अशी अपेक्षा आहे.

## वर्णमाला –

**स्वर –** (स्वतंत्रपणे उच्चारता येण्याजोगा वर्ण म्हणजे स्वर)

**ऱ्हस्व स्वर –** अ, इ, उ, ए, ओ


**दीर्घ स्वर –** आ, ई, ऊ, ऐ, औ

## टीप –

संस्कृत वर्णमालेतील ऋ, ॠ, लृ, ऐ, औ हे स्वर अर्धमागधी प्राकृतात नाहीत.

## (1) प्राकृत वर्णमाला

प्राकृत भाषा ही एक प्राचीन भाषा आहे. यामध्ये अर्धमागधी, मागधी, शौरसेनी, पैशाची, चूलिका–पैशाची, महाराष्ट्री, अपभ्रंश इत्यादी १८ विविध बोलीभाषांचा समावेश होतो. या भाषेच्या अध्ययनाने प्राचीन भारतीय संस्कृतीचे, समाजाचे, बोलीभाषांचे तसेच राजकीय घडामोडींचेही दर्शन होण्यास मदत होते. एवढेच नव्हे तर आधुनिक भारतीय भाषा कसकशा विकसित होत गेल्या याचाही परिचय होण्यास मदत होते. म्हणून प्राकृत भाषेतील वर्णमालांचा विद्यार्थ्यांना प्रथम परिचय व्हावा या अपेक्षेने प्राकृत भाषेतील वर्णमाला पुढीलप्रमाणे दिलेली आहे.




## 1. प्राकृत भाषेतील स्वर

1. प्राकृत भाषेत अ, आ, इ. ई, उ, ऊ, ए, ओ एवढेच स्वर आहेत.
2. ऐ, औ, अः, ऋ, ॠ, लृ, ॡ हे संस्कृतातील स्वर उच्चारण्यास सुलभ व्हावेत म्हणून काही बदल करून ते प्राकृत भाषेत आलेले दिसतात.
3. स्वरांची ऱ्हस्व, दीर्घ आणि सजाती – विजाती स्वर अशी विभागणी केलेली दिसून येते.
4. अ, इ, उ, ए, ओ या स्वरास ऱ्हस्व स्वर म्हणतात तर आ, ई, ऊ (ऐ, औ) यांना दीर्घ स्वर म्हणतात.
5. अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ह्या जोड्या सजातीय (समान) स्वरांच्या आहेत, तर अ, इ, उ इत्यादी स्वरांना विजातीय (वेगळ्या प्रकारचे) स्वर म्हणतात.
6. ऐ, औ, अः ऋ, लृ हे स्वर प्राकृतात नसले तरी त्याचे सुलभीकरण करून ते प्राकृतात पुढीलप्रमाणे आलेले दिसून येतात.

## (अ) स्वरांचे बदल

### 1) ऐ – ए, अइ असा बदल होतो.

कैलास = केलास, कइलास

वैकुंठ = वेकुंठ (वेगुंठ), वइकुंठ

वैरी = वेरि, वइरी

कैकयी = केगइ, कइकयी

मैत्री = मेत्ती, मइत्ती

सैन्य = सेन्न, सइन्न, सेना

दैव = देव, दइव

### 2) औ = ओ, अउ होतो.

गौरी = गोरी, गउरी

गौतम = गोयम

कौशांबी = कोसंबी, कउसंबी

नौ = नोव, नउ

गौड = गोड, गउड

कौतुक = कोउय, कउउय

नौका = नोका, नउका

गौरव = गोरव, गउरव

यौवन = जोवण्णं

औषध = ओसह, अउसह

पौर = पोर, पउर

कौमुदी = कोमुई, कउमुई

### 3) आ, ई, ऊ या आद्य स्वरांवर अनुस्वार आल्यास ऱ्हस्व होतो.

पांसु = पंसु

वांछिय = वंछिय

मांस = मंस

पांडव = पंडव

पांडित्य = पंडिच्च

क्षांत = खंत

### 4) आ, ई, ऊ या स्वरांपुढे जोडाक्षर आल्यास त्याचे ऱ्हस्वमध्ये परिवर्तन होते.

धान्य = धन्न

भार्या = भज्जा

परीक्षा = परिक्खा

पूर्णिमा = पुण्णिमा

तीव्र = तिव्व

दीक्षा = दिक्खा

पूर्व = पुव्व

कीर्ति = कित्ति

राज्य = रज्ज

### 5) प्राकृतमध्ये (अः) विसर्गाऐवजी 'ओ' चा उपयोग केला जातो.

रामः = रामो

देवः = देवो

नृपः = निवो

### 6) ऋ = अ, इ, उ, ए, रि होतो.

#### 1) ऋ = अ

| | | | |
|---|---|---|---|
| मृत = मय | घृत = घय | मृदु = मउ | कृष्ण = कण्ह |
| कृत = कय | तृण = तण | मृत्यु = मच्चु | तृष्णा = तण्हा |

2) **ऋ = इ**

| | | | |
|---|---|---|---|
| ऋषी = इसी | मृषा = मिसा | गृह = गिह | कृष्ण = किसन |
| मृग = मिग | दृढ = दिढ | नृप = निव | कृश = किस |

3) **ऋ = उ**

| | | | |
|---|---|---|---|
| ऋतु = उतु,उउ. | मृषा = मुसा. | वृद्‌ध = वुड्ढ | मातृ = माउ |
| प्रावृष = पाउस. | भ्रातृ = भाउ. | पितृ = पिउ | वृष्टि = वुट्‌ठि |

4) **ऋ = ए होतो.**

गृह = गेह

5) **ऋ = रि**

ऋण = रिण   ऋद्‌धि = रिद्‌धि   वृषभ = रिसह   ऋषि = रिसि

## (ब) प्राकृतातील व्यंजन

**व्यंजने (स्वरांच्या मदतीने उच्चारता येण्याजोगा वर्ण म्हणजे व्यंजन)**

**टीप –**

1) संस्कृतमधील 'ङ्' आणि 'ञ्' या व्यंजनाचा अर्धमागधीत उपयोग केला जात नाही. त्यांचे अनुस्वारात रूपांतर होते.

2) संस्कृतमधील विसर्ग अर्धमागधीत नाही. त्याऐवजी 'ओ' होतो.

3) अनुनासिकापुढे व्यंजन आल्यास त्याचा अनुस्वार करण्याची प्रथा आहे. उदा. वंक, संख, अंजलि, कंप पयंड

4) मराठी वर्णमालेतील ळ, क्ष, ज्ञ ही व्यंजने अर्धमागधीत नाहीत. तरीही त्यांचे रूपांतर होऊन ते प्राकृतात येतात.

**1) प्राकृतात 'श', 'ष' ऐवजी 'स' वापर केला जातो.**

| | | |
|---|---|---|
| शशी = ससी | शत = सय | भूषण = भूसण |
| कृषी = किसी | महिषी = महिसी | मूषक = मूसक, मूसय |

**2) प्राकृतात ळ, क्ष, ज्ञ ही व्यंजने उच्चारण्यास कठोर असल्याने त्यांच्याऐवजी 'ळ' = ल, क्ष = क्ख, च्छ, छ, ख आणि ज्ञ = ण चा वापर केला जातो.**

1) ळ = ल,   कमळ = कमल,   नळ = नल,   फळ = फल

2) ज्ञ = ण, ज्ञान = णाण, ज्ञात = णात,णाय, ज्ञानेश्वर = णाणेसर

3) क्ष = च्छ, क्ख वृक्ष = रूक्ख, रूच्छ वक्षस्थल = वच्छत्थल, वक्खत्थल
क्षीर = खीर क्षण = खण,

| उच्चार स्थान | वर्ग | व्यंजने |
|---|---|---|
| कंठ | क | क्, ख् ग्, घ्, ङ् |
| तालव्य | च | च्, छ्, ज्, झ्, ञ् |
| मूर्धन्य | ट | ट्, ठ्, ड्, ढ्, ण् |
| दन्त्य | त | त्, थ्, द्, ध्, न् |
| ओष्ठ | प | प्, फ्, ब्, भ्, म्, |
| (कंठ, तालव्य, मूर्धन्य, दंत) | अन्तस्थ | य्, र्, ल्, व् |
| | उष्म वर्ण | स् |
| | महाप्राण | ह् |

अ) 'क ते प' वर्गातील पहिल्या चार व्यंजनांना **स्पर्श व्यंजने** म्हणतात.

1) स्पर्श व्यंजने बलाने सर्वांत अधिक असतात.

2) त्यांच्या बलाचा क्रम उतरता आहे 'क्' हे सर्वांत लहान आणि 'भ्' हे सर्वांत बलवान आहे.

ब) 'ङ्, ञ्, ण्, न्, म्' या व्यंजनांचा उच्चार काही प्रमाणात नाकातून होतो. म्हणून त्यांना **अनुनासिके** म्हणतात.

1) अनुनासिके बलाने दुसऱ्या क्रमांकाची म्हणजे स्पर्श व्यंजनाहून कमी बलाची असतात.

क) 'य्, र्, ल्, व्' या व्यंजनांना **अन्त्य व्यंजने** म्हणतात.

1) प्रत्येक अन्त्यस्थ व्यंजनांचे उच्चार, स्थान भिन्न भिन्न असून सर्व **अन्त्यस्थ** व्यंजने बलाने तिसऱ्या क्रमांकाची म्हणजे बलाने सर्वांत कमी बलाची आहेत.

2) याच्यामध्ये 'व्, ल्, र्, य्'म्हणजे 'व्' सर्वांत बलवान आणि य् हे सर्वांत कमी बलाचे आहे.

ड) 'स्' हे **उष्म व्यंजन** आहे. याच्या उच्चारामध्ये इतर व्यंजनांच्या तुलनेने फुप्फुसातील हवा अधिक बाहेर पडते.शिवाय घर्षण प्रक्रियाही होते. म्हणून याला **उष्म वर्ण** म्हणतात. उष्म वर्ण बलाने कमी आहे. (तरीही अंतस्थ व्यंजनापेक्षा अधिक बलवान असल्याचे मानले आहे.)

ई) 'ह्' या व्यंजनांचा उच्चार करत असताना फुप्फुसातील हवा अधिक प्रमाणात बाहेर पडते म्हणून यास **महाप्राण** म्हटले जाते. (प्राण म्हणजे हवा) 'ह्' चे द्वित्व केव्हाच होत नाही.

## 1. असंयुक्त व्यंजनांचे बदल

व्यंजनांच्या बदलामध्ये प्रामुख्याने असंयुक्त आणि संयुक्त असे दोन प्रकार आहेत. त्यामध्येही आद्य, मध्य, अन्त्य असे विभाग दिसून येतात. आद्य म्हणजे अगोदरचे, अनाद्य म्हणजे अगोदर नसलेले (मध्य, अन्त्य, ठिकाणी असलेल्यांना अनाद्य असेही म्हटले जाते.)

1) शब्दांच्या आरंभी 'य' असेल तर प्राकृतात त्याचे 'ज' होते.

यात्रा = जत्ता  यादव = जादव  यथा = जहा

योगी = जोगी  यमुना = जमुणा  यम = जम

2) शब्दांच्या प्रारंभी असलेल्या 'क' चे केव्हां 'ख' होते.

कीला = खीला  कुब्जा = खुज्जा, खुजा  कुळ = खुल  कर्पर = खप्पर

3) शब्दांच्या प्रारंभी असलेल्या 'प'चे केव्हा 'फ' होते.

पुरुष = फरुस  परशु = फरसु  परिखा = फलिहा  परिघ = फरिह

4) शब्दांच्या प्रारंभी असलेल्या 'य'चे केव्हा 'त' होते.

युष्मद = तुम्हे

5) शब्दाच्या प्रारंभी असलेल्या 'श' 'ष' 'स' चे केव्हा 'छ' होते.

शाव = छाव  सुधा = छुहा  षण्मुख = छम्मुह  षष्ठ = छट्ठ

6) आद्य 'क्ष' चे केव्हा 'ख' होते.

क्षीर = खीर  क्षण = खण  क्षेत्र = खेत्त  क्षत्रिय = खत्तिय

7) केव्हा केव्हा आद्य 'गृ' = घ होते

गृह = घर

8) केव्हा केव्हा ज = झ होते.

जटिल = झटिल, झडिल

9) केव्हा आद्य च = त होते.

चिकित्सक = तिगिच्छग

10) केव्हा केव्हा आद्य त = च, छ होते.

तुच्छ = चुच्छ, छुच्छ, त्याग = चय, छय

11) केव्हा केव्हा आद्य त = ट होतो.

तगर = टगर

12) केव्हा केव्हा आद्य द = ड होते.

दाह = डाह दह = डह दंश = डंस

13) केव्हा केव्हा आद्य न = ण होतो.

नदी = णई नर = णर नमो = णमो

नाम = णाम नारी = णारी नूणं = णूणं

1) **'य' श्रुती =** केव्हा केव्हा अनाद्य (मध्य अन्त्य) ठिकाणी असलेल्या क, ग, च, ज, त, द असंयुक्त व्यंजनांचा लोप करून 'अ, किंवा य लिहिले जाते. यालाच 'य' किंवा 'अ' श्रुती असे म्हणतात.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | क = य | कणक = कणय | उदक = उयय | शोक = सोय |
| | | जनक = जणय | नरक = नरय | नाक = नाय |
| | | सकल = सयल | लोक = लोय | काक = काय |
| 2) | ग = य | नगर = नयर | सागर = सायर | मृग = मिय |
| | | मगर = मयर | आगर = आयर | साग = साय |
| 3) | च = य | आचार = आयार | उपचार = उवयार | वचन = वयण |
| | | कवच = कवय | नीच = नीय | काच = काय |
| 4) | ज = य | सुजण = सुयण | गज = गय | पूजा = पूया |
| 5) | त = य | शीतल = सीयल | गीत = गीय | पिता = पिया |
| 6) | द = य | पाद = पाय | हृदय = हियय | वेद = वेय |

2) **‘ह’ –श्रुती** = ख, घ, थ, ध, फ, भ’ ही व्यंजने अनाद्य असंयुक्त ठिकाणी असतील तर त्या व्यंजनाचा लोप होऊन त्या ठिकाणी ‘ह’ लिहिले जाते. यालाच ‘ह’ श्रुती म्हटले जाते.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) | ख = ह | मेखला = मेहला | सुख = सुह | मुख = मुह |
| | | नख = नह | शाखा = साहा | सखी = सही |
| 2) | घ = ह | मेघ = मेह | राघव = राहव | लघु = लहु |
| | | संघ = संह | | |
| 3) | थ = ह | रथ = रह | नथ = नह | कथा = कहा |
| | | नाथ = नाह | यथा = जहा | |
| 4) | ध = ह | मधु = महु | मगध = मगह | बधिर = बहिर |
| | | मधुर = महुर | दधि = दहि | विधि = विहि |
| 5) | फ = ह | विफल = विहल | मुक्ताफल = मुत्ताहल | सफल = सहल |
| 6) | भ = ह | स्वभाव = सहाव | लोभ = लोह | नभ = नह |
| | | त्रिभुवन = तिहुयण | शुभ = सुह | प्रभू = पहू |

3) केव्हा केव्हा अनाद्य असंयुक्त ‘ठ, थ, म = ढ’ होतो.

| | | | |
|---|---|---|---|
| ठ | पाठ = पाढ | पीठ = पीढ | कठोर = कढोर |
| थ | प्रथम = पढम | शिथिल = सिढिल | पृथ्वी = पुढिवी |
| ट | शकट = सयढ | विकट = वियढ | |
| म | विषम = विसढ | | |

## असंयुक्त व्यंजनांचे बदल

प्राचीन काळापासून प्राकृत भाषेस सामान्यांची बोलीभाषा म्हणून संबोधले जाते. कारण सामान्य लोकांना कठोर किंवा संयुक्त व्यंजनाचे उच्चार करणे कठीण होते. त्यामुळे उच्चारण्यास सोप्या व्यंजनांचाच प्राकृत भाषेत अधिक वापर केला जात असलेला दिसून येतो. थोडक्यात उच्चारण्यास कठोर असलेल्या व्यंजनांचा प्राकृत भाषेत सोप्या वर्णांमध्ये बदल केला जातो. त्यालाच **व्यंजनांचे बदल** म्हटले जाते. यामध्ये व्यंजनांचे द्वित्व करणे, सोपेकरण, सुलभीकरण करणे, अनुनासिकीकरण करणे, वर्णागम, वर्णलोप, वर्णबदल, वर्णविपर्यय, स्वरविभक्ती आदी अनेक प्रकारे संयुक्त व्यंजनांचा बदल केला जातो.

**1) आद्य संयुक्त व्यंजनांचा लोप :**

प्राकृत भाषेत शब्दांच्या प्रारंभी केव्हाच जोडाक्षर येत नाही. त्यामुळे जोडाक्षरातील कमी बलाच्या व्यंजनाचा लोप केला जातो.

क्रम = कम  भ्रमण = भमण  प्रभात = पहाय  प्रथम = पढम

प्रभा = पहा  व्रत = वय  ध्वज = धय  व्रण = वण

2) केव्हा केव्हा अनाद्य संयुक्त व्यंजनातील कमी बलाच्या व्यंजनाचा लोप करून अधिक बलाच्या व्यंजनाचे द्‌वित्व केले जाते. (म्हणजेच अधिक बलाचे व्यंजन दोन वेळा लिहिले जाते.)

भक्त = भत्त  भग्न = भग्ग  धर्म = धम्म  चक्र = चक्क

रक्त = रत्त  लग्न = लग्ग  कर्म = कम्म  कर्ण = कण्ण

3) केव्हा केव्हा अनाद्य संयुक्त व्यंजनातील अधिक बलाच्या व्यंजनाचे द्‌वित्व न करता त्या वर्गातील प्रथम वर्णास द्‌वितीय आणि तृतीय वर्णास चतुर्थ व्यंजन जोडले जाते.

व्याघ्र = वग्घ  अर्थ = अत्थ  अर्ध = अद्‌ध

पथ्य = पत्थ  मूर्ख = मुक्ख  प्रस्तर = पत्थर

4) **अनुनासिकीकरण :-** प्राकृतात केव्हा केव्हा संयुक्त व्यंजनातील कमी व्यंजनाचा लोप करून (द्‌वित्व न करता) अनुस्वाराचा वापर केला जातो. याला अनुनासिकीकरण म्हणतात.

(अश्रु) = (अस्सु) अंसु  वक्र = (वक्क) वंक  वयस्स = वयंस

5) **तालव्यीकरण :-** केव्हा केव्हा दंत्य (त, थ, द, ध) व्यंजनाऐवजी तालव्य (च, छ, ज, झ) व्यंजनाचा उपयोग केला जातो. त्यास तालव्यीकरण म्हणतात.

सत्य = (सत्त) सच्चं,  विद्या = विज्जा,  पथ्य = पच्छ (पत्थ)

6) **मूर्धन्यीकरण :-** संयुक्त व्यंजनामध्ये दंत (त, थ, द, ध) व्यंजने असतील तर त्याच्या जागी मूर्धन्य व्यंजनाचा (ट, ठ, ड, ढ) वापर केला जातो. त्यास मूर्धन्यीकरण म्हणतात.

प्रतिमा = पडिमा  प्रथम = पढम  अर्ध = अड्‌ढ, अदध

प्रतिपन्न = पडिवन्न  कृत = कड, कट  ऊर्ध्व = उड्‌ढ

7) **वर्णागम :-** संयुक्त व्यंजनाच्या उच्चार सुलभतेसाठी एखाद्या वर्णाचा लोप करून एखाद्या बाह्य अ, इ, उ आदीचे आगमन होते.. त्यास वर्णागम म्हणतात.

स्त्री = इत्थी  विय = इव  उक्त = वुत्त

8) **सवर्णलोप :-** केव्हा केव्हा उच्चार सुलभतेसाठी समान उच्चारण असलेल्या वर्णातील (एकापुढे एक असतील तर) एकाचा लोप केला जातो. त्याला सवर्णलोप म्हणतात.

हृदय = (हियय) हिय   नववरा = नवरा   नववरी = नवरी

उदुंबर = (उउंबर) उंबर   गुरराखी = गुराखी

9) **वर्णलोप :-** मानवी स्वभावामुळे घाई गडबडीने बोलत असताना केव्हा केव्हा (अनाद्य, आद्य) अनावश्यक व्यंजनाचा लोप केला जातो.

देवकुल = (देवउल) देउल   अरण्य = रण्ण   राजकुल = (रायउल) राउल

नूनं = नूणं, णूणं

10) **वर्ण-विपर्यय :-** केव्हा केव्हा बोलण्याच्या गडबडीत शब्दांतील वर्णांचा क्रम बदलला जातो. त्याला वर्ण-विपर्यय म्हणतात.

वाराणसी = वाणारसी   नुकसान = नुसकान   निडळ = निढळ

ढणाल = ढलाण   आलाण = आणाल   चिकटणे = चिटकणे

ढपल्या = ढलप्या   मरहट्ठ = महरट्ठ   डिसकळ = डिकसळ

11) **स्वरभक्ति :-** काही कठोर व्यंजनांचे उच्चारण करणे कठीण होते तेव्हा त्याच्या सोपेकरणासाठी संयुक्त व्यंजने विभक्त केली जात. त्यास स्वरभक्ती म्हणतात.

रत्न = रयण   भार्या = भारिया   धर्म = धरम

सूत्र = सूतर   छत्रपती = छतरपइ   कर्म = करम

12) **प्राकृतात केव्हा केव्हा ज्ञ = न्न, ण्ण होते.**

संज्ञा = सन्ना, सण्णा   सर्वज्ञ = सव्वण्णु   प्रज्ञा = पन्ना, पण्णा.

13) **केव्हा केव्हा प्राकृतात 'श्न, स्न, ष्ण, त्स्न, न्ह = ण्ह' होतो**

प्रश्न = पण्ह   स्नान = ण्हाण   मध्यान्ह = मज्झण्ह

उष्ण = उण्ह   जोत्स्ना = जोण्हा

14) **केव्हा केव्हा प्राकृतात 'श्म, ष्म, स्म, क्ष्म = म्ह' होतो.**

काश्मीर = कम्हीर   ऊष्म = उम्ह   लक्ष्मण = लम्हण

विस्मय = विम्हय   ब्राम्हण = बम्हण

15) **प्राकृतमध्ये र्य, द्य = ज्ज होते.**

आर्य = अज्ज कार्य = कज्ज विद्या = विज्जा

भार्या = भज्ज मद्य = मज्ज आद्य = अज्ज

16) **प्राकृतात क्म, त्म = प्प होते.**

रुक्मिन = रुप्पिण आत्मा = अप्पा

17) **प्राकृतात त्स, प्स = च्छ होतो.**

वत्स = वच्छ उत्सव = उच्छव अप्सरा = अच्छरा